# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/ 3793

**अत्यंत महत्वाचे :** दिनांक : 17 SEP 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली
असलेल्या **पुणे/सातारा/सांगली/कोल्हापर व सोलापूर** जिल्हयातील
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका तसेच
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९ प्रगति अहवाल.**

संदर्भ :- १. मा. विभागीय आयुक्त, विधान भवन, पुणे यांचे पत्र क्र.रोहयो/वृक्ष लागवड/११/२०१९, दि. ०९.०९.२०१९.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक सावि-२०१८/प्र.क्र.१४४/फ-११, मुंबई-३२, दि.२१.०९.२०१८.

मा. विभागीय आयुक्त, विधान भवन, पुणे यांचे उपरोक्त विषयाचे संदर्भ १ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्राची छायांकित प्रत अधिक माहितीसाठी सोबत जोडली आहे. वरील विषयानुसार ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम २०१९ अंतर्गत जिल्हयांना दिलेले उद्दिष्ट दि. ३०.०९.२०१९ अखेर १०० टक्के साध्य करणेबाबत शासनाच्या सूचना आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ०९.०९.२०१९ अखेर सोलापूर जिल्हयाचे साध्य केलेले उद्दिष्ट हे अत्यंत असमाधानकारक असून पुणे, सातारा, कोल्हापूर व सोलापूर या जिल्हयांची वृक्ष लागवडीची सरासरी देखील राज्य सरासरी पेक्षा कमी असल्याचे सदर पत्रात नमूद केलेले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने, आपणास सूचित करण्यात येते की, या विभागीय कार्यालयास दिलेले वृक्ष लागवडीचे जिल्हानिहाय उद्दिष्ट विहित मुदतीत दिनांक ३०.०९.२०१९ पूर्वी १०० टक्के पूर्ण करुन, त्याबाबतची माहिती वन विभागाच्या **www.greenarmy.mahaforest.gov.in** या संकेतस्थळावर (फोटो व व्हिडिओसह) अपलोड करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वृक्ष लागवड प्रमाणपत्रसह या कार्यालयास सादर करावा. त्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या तपासल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. याविषयी काही अडचण आल्यास, आपल्या जिल्हयातील वनविभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांचेशी संपर्क साधून मार्गदर्शन घ्यावे.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

विभागीय आयुक्त कार्यालय
रोहयो शाखा, विधान भवन, पुणे
ईमेल - egsdc.pune-mh@gov.in दुरध्वनी :- ०२०-२६३६१०५९

पत्र क्र. रोहयो/वृक्ष लागवड/११ /२०१९ दिनांक :- ९/९/२०१९

प्रती

१. जिल्हाधिकारी
पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर

२. मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.)
पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर

**विषय :- ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९ प्रगति अहवाल**

संदर्भ :- १. शासन निर्णय महसूल व वन विभाग,क्रमांक सावनि -२०१८ /प्र.क्र.१४४ /फ-११ , मुंबई- ३२ , दि.६/९/२०१८ व शासन पत्र दि. २१/९/२०१८

वरील विषयानुसार ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम २०१९ अंतर्गत जिल्ह्यांना दिलेले उधीष्ट ३०/९/२०१९ अखेर १००% साध्य करनेबाबत शासनाच्या सूचना आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ९/९/२०१९ अखेर जिल्हानिहाय प्रगति पुढीलप्रमाणे आहे .

| अ.क्र | जिल्हा | वृक्ष लागवड लक्षांक | वृक्ष लागवड संख्या | वृक्ष लागवड % | राज्यातील क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | १५२३७८०० | १२३५११४५ | ८१.११ | २९ |
| २ | सातारा | १२४००७५० | १०३११३४४ | ८३.१५ | २६ |
| ३ | सांगली | ७२२९३५० | ६०८८७१६ | ८४.२२ | २५ |
| ४ | कोल्हापूर | ११३३०४०० | १०८७६३१५ | ९५.९९ | ९ |
| ५ | सोलापूर | ८५५२३५० | ४७४५६४९ | ५५.४९ | ३५ |
| | एकूण | ५४७५०६५० | ४४३८११६९ | ८१.०६ | |

या वृक्ष लागवडीमध्ये जिल्हा परिषदांना दिलेले लक्ष साध्य पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जिल्हा | वृक्ष लागवड लक्षांक | | | वृक्ष लागवड संख्या | वृक्ष लागवड प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत | ग्रामविकास विभाग | एकूण | | |
| १ | पुणे | ४४७८२०० | ४१०१०० | ४८८८३०० | ३२१८५९५ | ६५.८४ |
| २ | सातारा | ४७८८७०० | ६६००० | ४८५४७०० | ३५१०९८३ | ७२.३२ |
| ३ | सांगली | २२३७५०० | ५६७०० | २२९४२०० | १५३२७३८ | ६६.८१ |
| ४ | कोल्हापूर | ३२८७४५० | ५१९०० | ३३३९३५० | ३२३०७३६ | ९६.७५ |
| ५ | सोलापूर | ३२९३८५० | ७००९०० | ३९९४७५० | १३१४२३६ | ३२.९० |
| | एकूण | १८०८५७०० | १२८५६०० | १९३७१३०० | १२८०७२८८ | ६६.११ |

यात सोलापूर जिल्ह्याचे काम अत्यंत असमाधानकारक असून पुणे,सातारा, सांगली जिल्ह्याचे काम देखील राज्य सरासरी पेक्षा कमी आहे .

रेल्वे,वित्त,कामगार , गृह(जेल),शालेय शिक्षण,उच्च शिक्षण,वैद्यकीय शिक्षण , कौशल्य विकास ,दुग्ध व्यवसाय, वाहतूक(एस.टि.), जलसंपदा विभाग, राज्य उत्पादन शुल्क या विभागांनी विभाग स्तरावरील लक्ष १०० % हून अधिक साध्य केले आहे.

तर उर्वरित विभागांनी अध्याप त्यांचे लक्ष साध्य केले नाही. यात प्रामुख्याने कृषी , सहकार, सार्वजनिक आरोग्य,,सार्वजनिक बांधकाम ,गृह(पोलिस),रेशीम शेती ,तांत्रिक शिक्षण, महानगरपालिका , नगरपालिका या विभागांना मोठे लक्ष असून त्यांनी व इतर विभागांनी आपणास निर्धारित लक्ष ३०/९/२०१९ पर्यन्त १००% साध्य करावे .

(डॉ. दिपक म्हैसेकर )
विभागीय आयुक्त , पुणे विभाग,पुणे -१

प्रत :- माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१. मुख्य वनसंरक्षक पुणे/कोल्हापूर
२. वनसंरक्षक सामाजिक वनीकरण पुणे
३. उपमुख्य वनसंरक्षक पुणे/भोर/जुन्नर/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर
४. विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण)पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर
५. ३३ कोटी वृक्ष लागवड लक्षांक दिलेल्या विभागांचे सर्व विभागीय प्रमुख